चंद्रपूर वनविभागातील रामबाग वनवसाहतीच्या परिसरात नवीन वनविश्रामगृहाचे इमारतींकरिता फर्निचर, विद्युतीकरण व किरकोळ काम तसेच अंतर्गत रस्ते व इतर बाबींचा समावेश असलेल्या बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.वनबां-२०१८/प्र.क्र.१८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०१ मार्च, २०१८

<u>**वाचा :-**</u> (१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४(३)/वअ/प्र.क्र.१४१/९१२/२०१७-१८, दिनांक ०५.०१.२०१८

प्रस्तावना:-

चंद्रपूर वनविभागातील रामबाग वनवसाहतीच्या परिसरात नवीन वनविश्रामगृहाचे इमारतींकरिता फर्निचर, विद्युतीकरण व किरकोळ कामाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी त्याकामाचे रू.२,९०,२५,२००/- इतक्या रकमेच्या दोन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भाधिन पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारशीसह प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने अंदाजपत्रकाचे छाननीअंती रामबाग वनवसाहतीच्या परिसरात नवीन वनविश्रामगृहाचे इमारतींकरिता फर्निचर, विद्युतीकरण व किरकोळ काम तसेच अंतर्गत रस्ते व इतर बांबीचा समावेश असलेल्या बांधकामासाठी जी.एस.टी.सह रू.३,१०,०८,०७४/- (रुपये तीन कोटी दहा लक्ष आठ हजार चौऱ्यात्तर फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाच्या रू.३,१०,०८,०७४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

चंद्रपूर वनविभागातील रामबाग वनवसाहतीच्या परिसरात नवीन वनविश्रामगृहाचे इमारतींकरिता फर्निचर, विद्युतिकरण व किरकोळ काम तसेच अंतर्गत रस्ते व इतर बांधकामासाठी रू.३,१०,०८,०७४/-(रुपये तीन कोटी दहा लक्ष आठ हजार चौऱ्यात्तर फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिलेल्या सहमतीस व खालील अटींच्या अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत असताना उपभोक्त्या विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र.९६/इमा-३, दिनांक ८.७.२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.
२. सदर प्रस्तावासोबत सादर केलेल्या २ अंदाजपत्रकांना एकत्रित एकच प्रशासकीय मान्यता देवून एकाच निविदेद्वारे काम हाती घ्यावे.
३. काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.
४. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करूनच काम हाती घ्यावे.
५. प्रत्यक्ष काम करते वेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही/२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
६. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तरतूद तसेच प्रचलित कायदे / नियम संदर्भाधिन तरतूदींचा भंग होणार नाही. तसेच कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५ मे, २००९, वित्तीय अधिनियम नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार, अ.क्र. १, परिच्छेद क्र. १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहमतीने, निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११७५३४६३४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.01 17:54:31 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर
४. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

६. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

शासन निर्णय क्रमांक :-वनबां-२०१८/प्र.क्र.१८/फ-९, दिनांक ०१ मार्च,२०१८ सोबतचे “प्रपत्र-अ”

NAME OF WORK :- PROVIDING OFFICE FURNITURE WITH ELECTRICAL WORK AND GARDEN FOR V-VIP REST HOUSE AT RAMBAG FOREST COLONY PREMISES, AT CHANDRAPUR, DIST. CHANDRAPUR		
GENERAL ABSTRACT		
S.N.	**PARTICULARS**	**Amount in Rs.**
1	COST AS PER ABSTRACT	95,92,568.00
2	ADD L.S. FOR MURAL WORK	3,00,000.00
3	COST AS PE ABSTRACT OF ELECTRICAL WORK ESTIMATE	75,00,000.00
	TOTAL :-	**1,73,92,568.00**
4	ADD 4% FOR CONTINGENCIES CHARGES	6,95,703.00
5	ADD 5% FOR CENTAGE CHARGES	8,69,628.00
6	ADD 12% FOR GST	20,87,108.00
	Total Amount (A) :-	**2,10,45,007.00**
NAME OF WORK :- CONSTRUCTION OF INTERNAL ROAD & DRAIN IN THE PREMICES OF RAMBAGH FOREST COLONY AT CHANRAPUR DIST. CHANDRAPUR		
1	COST AS PER ABSTRACT OF B.T.ROAD	47,12,500.00
2	COST AS PER ABSTRACT OF C.C.DRAIN	34,53,949.00
	TOTAL :-	**81,66,449.00**
4	ADD 4% FOR CONTINGENCIES CHARGES	3,26,658.00
5	ADD 1% FOR INSURANCE CHARGES	81,664.00
6	ADD 12% FOR GST	9,79,974.00
	Total Amount (B) :-	**99,63,067.00**
	Total (A+B) :-	**3,10,08,074.00**

****